ससून गोदी बंदर व भाऊचा धक्का (Ferry Wharf) यांचे पुर्नविकास व आधुनिकीकरणाबाबत समन्वय समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक: मत्स्यआ-२०१७/प्र.क्र.२८४/पदुम-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २०/१/२०१८

वाचा:- (१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.मत्स्यआ-२०१५/प्र.क्र.२६५/पदुम-१२, दिनांक ३०.८.२०१७.
(२) मा.केंद्रीय मंत्री, रस्ते वहातूक व नौकानयन, नवी दिल्ली यांचे दि.०९.११.२०१७ चे अ.शा.पत्र.
(३) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे दिनांक २३.११.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

मुंबई पोर्ट ट्रस्ट हे संपूर्ण ससून गोदी बंदराचा पुर्नविकास सागरमाला प्रकल्पातंर्गत करणार आहेत. तसेच महाराष्ट्र राज्यातील मत्स्यव्यवसाय विकासासाठी केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत ससून गोदी बंदराच्या आधुनिकीकरणाच्या रु.५२.१७ कोटी इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे व्यवस्थापन करण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन आणि अंमलबजावणी सल्लागार (Project Management and Implementation Consultant) (PMIC) ची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प राज्य शासनाची संस्था महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा.केंद्रिय मंत्री, रस्ते वाहतूक महामार्ग व नौकानयन, नवी दिल्ली यांचे संयुक्त बैठकीत, ससून गोदी बंदर व भाऊचा धक्का (Ferry Wharf) यांचा पुर्नविकास व आधुनिकीकरणाबाबत, अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

ससून गोदी बंदर व भाऊचा धक्का (Ferry Wharf) यांचा पुर्नविकास व आधुनिकीकरणाबाबत, अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समन्वय समिती निर्माण करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१	अध्यक्ष,मुंबई पोर्ट ट्रस्ट	अध्यक्ष
२	सचिव (पदुम)	सदस्य
३	आयुक्त मत्स्यव्यवसाय	सदस्य
४	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ,मुंबई	सदस्य

उपरोक्त समिती ससून गोदी बंदर व भाऊचा धक्का (Ferry Wharf) यांचा पुर्नविकास व आधुनिकीकरणाबाबत आढावा घेऊन झालेल्या प्रगतीबाबत समन्वय साधेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२०१७३२३०७६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2018.01.20 17:19:20 +05'30'

(विजय चौधरी)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.केंद्रीय मंत्री रस्ते वाहतूक व नौकानयन, नवी दिल्ली यांचे कार्यालय
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
४) मा.राज्यमंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
५) मा.मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
६) महालेखापाल, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई-३२.
७) अधिदान व लेखाधिकारी, बांद्रा, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई
९) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय,मुंबई
११) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव, (पदुम), मंत्रालय,मुंबई
१३) चेअरमन, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई
१४) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्या, मुंबई
१६) कार्यकारी अभियंता, (Civil), आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, मुंबई
१७) निवडनस्ती/पदुम-१२